पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र. ३०९६ दिनांक २६/०९/२०१९**

**फरासखाना पो स्टे पुणे शहर**

दिनांक २५/०९/२०१९

**प्रेस नोट**

**सराईत गुन्हेगारास पिस्तुल व जिवंत काडतुसासह फरासखाना पोलीसांनी केले जेरबंद**

दिनांक २५/०९/२०१९ रोजी फरासखाना पोलीस स्टेशन तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक वाय.पी. सुर्यवंशी व कर्मचारी हे हद्दीत गुन्हयांना प्रतिबंध घालण्याचे अनुषंगाने पेट्रोलींग करीत असतांना पोलीस नाईक दिनेश भांदुर्गे यांना त्यांचे गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, एक इसम बुधवार पेठ भागात पिस्तुलसह आला आहे. त्यानुसार बुधवार पेठ रेड लाईट भागात सापळा लावला असता मिळालेल्या माहितीप्रमाणे संशयीत इसमास शिताफीने पकडुन त्याची अंगझडती घेता त्याचे ताब्यात एक देशी हातबनावटीचे किं.रु. ३०,०००/- चे पिस्तुल व एक नग पितळी धातुचे जिवंत काडतुस किं.रु. ४००/- असा एकुण ३०,४००/- रु किं चा हत्याराचा माल मिळुन आल्याने तो त्याचेकडुन जप्त करुन त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव विशाल हरिश्चंद्र लाहुंडे वय २४ वर्षे धंदा व्यापार रा.मु.पो.सरस्वती कॉलनी देवकर वस्ती वॉर्ड नं.७ ता.श्रीरामपुर जि.अहमदनगर असे असल्याचे सांगितले. त्याचेबाबत अधिक माहिती घेता तो श्रीरामपुर पोलीस स्टेशन,श्रीरामपुर जि.अहमदनगर या पोलीस स्टेशनचे रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असुन त्याचेवर खुन व शस्त्र बाळगणे असे गंभीर गुन्हे दाखल असल्याचे समजले. सदर इसमावर फरासखाना पोलीस स्टेशन गु.र.नं.३५३/२०१९ आर्म ॲक्ट ३ (२५) व ३७ (१) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करुन त्यास अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई ही मा.श्री डॉ.संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त पश्चिम विभाग पुणे, मा.श्रीमती स्वप्ना गोरे मॅडम, पोलीस उपआयुक्त परिमंडळ १ व मा.श्री.प्रदिप आफळे, सहा पोलीस आयुक्त फरासखाना विभाग यांचे मार्गदर्शनाखाली फरासखाना पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.जगन्नाथ कळसकर, तपास पथकाचे प्रभारी पोलीस उप निरीक्षक वाय.पी. सुर्यवंशी, पोलीस हवालदार बापु खुटवड, केदार आढाव, पोलीस नाईक दिनेश भांदुर्गे, सचिन कुटे, अमर शिंदे, महावीर वलटे, पोलीस शिपाई मोहन दळवी, आकाश वाल्मिकी,मयुर भोकरे यांचे पथकाने केली.

(जगन्नाथ कळसकर)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
फरासखाना पोलीस स्टेशन पुणे